पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १३

**सभावृत्तांत**

दिनांक - **०२/११/२०१८** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०२/११/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**
२. मा.पवार मनिषा प्रमोद
**३**. मा.सागर बाळासाहेब गवळी
**४**. मा.संगिता(नानी) प्रभाकर ताम्हाणे
५. मा.कदम निकिता अर्जुन
६. मा.अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.चितळे – सहा.आयुक्त, मा.कोळंबे – मुख्यलेखापाल, मा.मोरे – कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये फलकांसाठी देणेत येणा-या परवानगीचे बाह्य जाहिरात धोरण ठरविणेबाबत.

विषय क्र.४) प्रभाग क्र.२८ यशवंतनगर चौक व रसरंग चौक सुशोभिकरण करणे या कामाच्या स्थळ बदलाबाबत – मा.निकिता कदम, मा.संगिता ताम्हाणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील यशवंतनगर चौकाचे सुशोभिकरण करणे या कामाच्या स्थळ बदलाबाबत – मा.संगिता ताम्हाणे, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील मौलाना अब्दुल कलाम चौकाचे सुशोभिकरण करणे या कामाच्या स्थळ बदलाबाबत – मा.मनिषा पवार, मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक १९/१०/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक १२**) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक - ५७ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०२/११/२०१८ विभाग – प्रशासन
सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.सागर गवळी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/९१५/२०१८, दि.०१/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महापालिका आस्थापनेवर " सह शहर अभियंता (स्था) " या अभिनामाची एकूण ०३ पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० मध्ये शासन मंजूर आहेत. प्रस्तुतच्या पदाकरीता शासन निर्णयाप्रमाणे निर्धारित केलेली अर्हता

अ) शासन निर्णय क्र.पीसीसी-३०९१/८६९/प्र.क्र.१४४/९१/नवि-२२, दि.१८/०४/९४ आणि क्र.पीसीसी-३०९४/११०९/प्र.क्र.२८८/९४/नवि-२२, दि.२५/०८/१९९८ नुसार पदोन्नती -

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी (बी.ई.सिव्हील)
२. उपअभियंता या पदावरील १० वर्षे सलग सेवा अनुभव आवश्यक किंवा
३. कार्यकारी अभियंता या पदावरील कामकाजाचा सलग ५ वर्षे अनुभव.

ब) शासन निर्णय क्र.पीसीसी-३०१०/२२५/प्र.क्र.६६/नवि-२२, दि.७ जून २०१० नुसार पदोन्नती –

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका (बी.ई.सिव्हील/डी.सी.ई.)
२. कार्यकारी अभियंता या पदावरील कामकाजाचा पदवीधारक असल्यास ७ वर्षे व पदविकाधारक असल्यास किमान १० वर्षाचा अनुभव.

सद्यस्थितीमध्ये या संवर्गामध्ये एक पद रिक्त असून श्री.पठाण आयुबखान अहमदखान, सहशहर अभियंता यांच्या दि.३०/०९/२०१८ रोजीच्या नियत वयोमान सेवानिवृत्तीमुळे आणखी एक पद रिक्त होत आहे. प्रस्तुतची पदे पदोन्नतीने भरणेबाबत दि.०४/०९/२०१८ व दि.१९/०९/२०१८ रोजी पदोन्नती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व कार्यकारी अभियंता (स्था) तसेच उपशहर अभियंता पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, गोपनीय अहवाल, सेवा जेष्ठता आणि मत्ता व दायित्व इ. सेवा विषयक तपशील पडताळून श्री.निकम मकरंद ज्ञानोबा यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० मध्ये सह शहर अभियंता (स्था) पदावर स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाजेष्ठता व पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या याचिका क्र.४२०६/२००८, क्र.४२०७/२००८, क्र.१५३१/२००९, क्र.१२२४८/२००९, क्र.२२५९/२०१५, क्र.४२३०/२०१८ आणि मे.आकुर्डी न्यायालय येथे न्यायप्रविष्ठ असलेली याचिका क्र.३२/२००८ व मे.औद्योगिक न्यायालय, पुणे येथे दाखल कंप्लेट युएलपी क्र.१७/२०१४ तसेच पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सेवाजेष्ठते नुसार पदोन्न्तीच्या कोठयातील खुल्या प्रवर्गाच्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.विधी/मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देणेबाबत सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, श्री.निकम मकरंद ज्ञानोबा यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० मध्ये सह शहर अभियंता (स्था) पदावर स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाजेष्ठता व पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या याचिका क्र.४२०६/२००८ क्र.४२०७/२००८, क्र.१५३१/२००९, क्र.१२२४८/२००९, क्र.२२५९/२०१५, क्र.४२३०/ २०१८ आणि मे.आकुर्डी न्यायालय येथे न्यायप्रविष्ठ असलेली याचिका क्र.३२/२००८ व मे.औद्योगिक न्यायालय,

पुणे येथे दाखल कंप्लेट युएलपी क्र.१७/२०१४ तसेच पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्य न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सेवाजेष्ठते नुसार पदोन्न्तीच्या कोठयातील खुल्या प्रवर्गाच्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५८ विषय क्रमांक - ०२
दिनांक - ०२/११/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सुचक : मा.सागर गवळी अनुमोदक : मा.मनिषा पवार
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/१/कावि/१८०/२०१८, दि.१९/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.५ मधील कुदळवाडी येथील भैरवनाथमंदिर परिसरात अपुरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असलेने मा.कार्यकारी अभियंता (फ क्षे.का. पाणीपुरवठा ) यांनी लेखी कळविलेनुसार तेथील शाळेजवळ बुस्टर पंप बसविणेचे नियोजन करणेत आलेले होते. त्यास अनुसरून जलशुद्धीकरण केंद्र से.२३ (विद्युत) विभागामार्फत निविदा (नि.नो.क्र.९।१-२०१६।१७) कार्यवाही पूर्ण करून कामाचे आदेश क्र.पापु।०६।१९९९।२०१६ दि.२६।१२।२०१६ अन्वये मे.व्हॅन इंजि.कं.याना देण्यात आले आहे. सदर कामाची मुदत ४ महिने म्हणजेच दि.२५।०४।२०१७ पर्यंत होती. उपरोक्त विषयांकित कामाची अंदाजपत्रकिय रक्कम रु.१६,१४,४५९।- असून मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२०६७९ दि.२७।०२।२०१७ अन्वये सदर निविदा ९.१०% कमी दराने मंजूर करणेत आलेली आहे. एजन्सीने कामातील नमूद सहित्याचा पुरवठा दि. ७।०३।२०१७ रोजी केलेला असून त्यापोटी एजन्सीला र.रू.५,५४,३६८।- अदायगी करणेत आलेली आहे. पाणीपुरवठा विभागाने सदर पंप बसविणेसाठी जागा निश्चिती करून त्या ठिकाणी नकाशाप्रमाणे चेंबर बांधणी करणेसाठी खोदकाम करणेत आले असता तेथील स्थानिक ग्रामस्थांनी त्यास जोरदार विरोध दर्शवून करणेत आलेले खोदकाम परत बुजविणेत आले. वरील कारणास्तव विषयांकित कामास प्रथम दि.३०.०६.२०१७ व त्यानंतर दि.१५.०९.२०१७ पर्यंत आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी मुदतवाढ घेण्यात आलेली आहे. सदर कामातील पंप व यंत्रसामुग्री तातडीने वापरात आणावयाच्या दृष्टीने पंप बसविणेसाठी आवश्यक योग्य ती जागा उपलब्ध करून मिळणेबाबात मा.कार्यकारी अभियंता (फ क्षे.का. पाणीपुरवठा) यांचेकडे समक्ष संपर्क साधून तसेच मा.सह-शहर अभि.(पा.पु.) यांचेसोबत वेळोवेळी होणा-या आढावा बैठकित विचारणा करणेत आली. त्यास अनुसरून दि. १२.०२.१०१८ च्या मा.सह-शहर अभि.(पा.पु.) यांचेसोबत मा.कार्यकारी अभि.(वि) व मा.कार्यकारी अभि.(पा.पु.) यांचे बैठकिमधील चर्चेप्रमाणे भैरवनाथ मंदिर कुदळवाडी येथील ग्रामस्थांचा विरोध लक्षात घेता सदर ठिकाणी तातडीने जागा उपलब्ध करून देणे शक्य नसल्याने सदरचे पंप (सन्माननिय सदस्य श्री.जावेद शेख यांनी केलेल्या मागणीनुसार) प्राधिकरणातील लोकमान्य हॉस्पिटल समोरील अशोका बस-स्टॉप परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असलेने सदर ठिकाणी बसविणेत यावे असा निर्णय घेणेत आला. वरील निर्णयानुसार पाणीपुरवठा विभागाने सदर ठिकाणी खोदकाम करून पंप बसविणेस आवश्यक चेंबरचे बांधकाम पूर्ण केलेले आहे. तसेच पंप बसविणेचे जागी पाणीवितरण नलिकेमधे आवश्यक व्हॉल्व्ह बसविणेत आले आहेत. तसेच सदर पंपचलनासाठी म.रा.वि.वि. कंपनी

कडून आवश्यक विजभार मंजूर होउन नविन विजमीटर मंजूर झाला आहे. सबब सदर ठिकाणी विषयांकित कामातील पंप बसविणे आवश्यक असून प्रत्यक्ष कार्यस्थळात बदल होणार आहे. त्याकरिता स्थळबदलास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ५९ — विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०२/११/२०१८ — विभाग – आकाशचिन्ह परवाना

सुचक : मा.सागर गवळी — अनुमोदक : मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/४/कावि/११७/२०१८, दि.२०/१०/२०१८

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये फलकांसाठी देणेत येणा-या परवानगीचे बाह्य जाहिरात धोरण ठरविणेबाबत..

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६० — विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०२/११/२०१८

सुचक : मा.निकिता कदम — अनुमोदक : मा.संगिता ताम्हाणे

संदर्भ – मा.निकिता कदम, मा.संगिता ताम्हाणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.२८ यशवंतनगर चौक व रसरंग चौक सुशोभिकरण करणे या कामाचा आदेश निविदा क्रमांक ५३/२६-२०१७-१८ अन्वये दिनांक ११/०१/२०१८ रोजी देण्यात आलेला असून सदर सदर कामाची निविदा र.रु.२३,३३,८९७/- इतकी आहे. सदरचे काम काही प्रमाणात झाले असून उर्वरित काम मा.नगरसदस्य यांचे मागणीनुसार प्रभाग क्र.९ मधील विविध भागामध्ये स्थापत्य विषयक व दुरुस्तीची कामे करणेसाठी सदर कामाच्या स्थळबदलास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६१ — विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०२/११/२०१८

सुचक : मा.संगिता ताम्हाणे — अनुमोदक : मा.सचिन भोसले

संदर्भ – मा.संगिता ताम्हाणे, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.२८ मासुळकर येथील यशवंतनगर चौकाचे सुशोभिकरण करणे या कामाचा आदेश निविदा क्रमांक ५३/३१-२०१७-१८ अन्वये दिनांक २३/०१/२०१८ रोजी देण्यात आलेला असून सदर सदर कामाची निविदा र.रु.२,३३,८००/- इतकी आहे. सदरचे काम काही प्रमाणात झाले असून उर्वरित काम

मा.नगरसदस्य यांचे मागणीनुसार प्रभाग क्र.९ मधील विविध भागामध्ये स्थापत्य विषयक व दुरुस्तीची कामे करणेसाठी सदर कामाच्या स्थळबदलास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६२ विषय क्रमांक - ०६

दिनांक - ०२/११/२०१८

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.निकिता कदम

संदर्भ – मा.मनिषा पवार, मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.२८ मासुळकर येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद चौकाचे सुशोभिकरण करणे या कामाचा आदेश निविदा क्रमांक ५३/५-२०१७-१८ अन्वये दिनांक ३०/०१/२०१८ रोजी देण्यात आलेला असून सदर सदर कामाची निविदा र.रु.२३,३४,१७४/- इतकी आहे. सदरचे काम काही प्रमाणात झाले असून उर्वरित काम मा.नगरसदस्य यांचे मागणीनुसार प्रभाग क्र.९ मधील विविध भागामध्ये स्थापत्य विषयक व दुरुस्तीची कामे करणेसाठी सदर कामाच्या स्थळबदलास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७१५/२०१८
दिनांक : ०२/११/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.